Impact Factor – 6.261 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

January -2019 Issue – 114(B)

**Chief Editor -**
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

**Executive Editors :**
Prof. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane-Nile, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS
For Details Visit To : www.researchjourney.net

© All rights reserved with the authors & publisher Price : Rs. 800/-



Scanned with CamScanner

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal | 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013) | January-2019
Issue 114 (B) - Recent Trends In Research
UGC Approved Journal

# महात्मा गांधी यांची रामराज्याची संकल्पना

डॉ. डी.एम. चौधरी
(इतिहास विभाग)
दादा पाटील महाविद्यालय,कर्जत
ता.कर्जत, जि.अहमदनगर
मो. ९७६६६२४९९५
Email-chaudhridattatray@gmail.com

**प्रास्ताविक:-**

महात्मा गांधीनी आपले राजकिय तत्वज्ञान 'हरिजन'व 'यंग इंडिया' या वृत्तपत्रातून व्यक्त केले आहे. त्यांचा दृष्टीकोण मानवतावादी होता.त्यांनी कर्म व चिंतन हयांचा समन्वय साधला होता. हिंदू स्वराज्य,आत्मकथा,माझे समकालीन, गीताबोध,

सर्वोदय,ब्रम्हाचर्य,राष्ट्रवाणी,मंगलप्रभात,ग्रामसेवा,खादी,आत्मशुध्दी,गीताई,धर्मनीती,आरोग्याची गुरुकिल्ली,रामनामाचे महत्व,सत्यवीराची कथा,सत्याग्रह,अनासक्ती,योग,इत्यादी प्रमुख ग्रंथ महात्मा गांधीजींनी लिहीले आहेत. गीता हया प्रमुख ग्रंथाचा त्यांच्यावर प्रभाव पडलेला होता. गीतेला ते आपले मार्गदर्शक मानत होते. गीतेने मला संकट काळात मार्गदर्शन केले असे गांधीजींनी म्हंटले आहे. रामायण ,महाभारत,आणि बौध्द धर्मातील ग्रंथाचाही प्रभाव त्यांचावर पडलेला होता.

राजकिय सत्ता हे साध्य नसून साधन आहे. याचे पदोपदी भान असणे गांधीजीनां अपेक्षित आहे. गांधीनी अशा राज्यांचे स्वप्न पाहिले,की ज्यात स्वत:च स्वत:चा शासक असेल , डेव्हीड हेन्री थोरोप्रमाणेच ते म्हणतात,तेच शासन चांगले जे कमीत कमी शासन करेल.महात्मा गांधीजींनी रामराज्याच्या निर्मितीसाठी सर्वोदय,ट्रस्टीशिप सिध्दांन्त, विकेंद्रीकरण, समता या व्यतिरिक्त व्यसनमुक्ती,अस्पृश्यता निवारण व ग्रामस्वराज्य,यांना देखील महत्वाचे स्थान दिलेले आहे. विनोबा भावे म्हणतात,'गांधीजीचे रामराज्य म्हणजे एखाद्या सुंदर स्त्रीने दागिने घालून मध्यरात्री जंगलातून सुरक्षितपणे एका गावाहून दुसऱ्या गावास जाणे होय ' अर्थात गांधीप्रणीत रामराज्यात जंगलव्यवस्था देखील सुरक्षित असेल.

**सर्वोदय :-**

जॉन रस्किनच्या 'अन टू धिस लास्ट 'चा प्रभाव सर्वोदयमध्ये गांधीजींना अपेक्षित आहे. गांधीजींनी हा शब्द व आशय जैन तत्वज्ञानातून घेतला. जैनांच्या तीन मुख्य सिध्दान्तांपैकी 'अनेकान्तात'याचाच अर्थ सर्वोदय होय.महत्तमांचे महत्तम सुख किंवा सोप्या शब्दात 'बहुजन हिताय बहुजन सुखाय' हा उपयुक्तवादी दृष्टीकोण गांधीजींना मर्यादित वाटतो. सर्वोदयाचा वापर सर्वांचे सुख अगर सर्वांचे कल्याण या अर्थाने वापरला आहे. त्यात गरीब,श्रीमंत,सशक्त, अशक्त असे सर्व येतात. सर्वोदयाचा व्यावहारिक अर्थ सांगताना गांधीजी म्हणतात,'कौटुंबिक मोहाचा त्याग ,धर्म,वर्ण,जातीभेद,आदी संकोचित भावनांचा नाश करून राष्ट्रीयते ऐवजी विश्वबंधुत्वासाठी प्रयत्न करणे म्हणजे सर्वोदय होय. या ठिकानी राजकिय पक्ष असणार नाही. राजनीतीची जागा लोकनिती घेईल.शासन संस्थेचे कार्यक्षेत्र अतिशय मर्यादित राहील आणि समाज सेवा हेच ध्येय असेल.[1]

**ट्रस्टीशिप सिध्दांन्त :-**

गांधीजींनी हा नाविण्यपुर्णविचार सामाजिक अर्थशास्त्राला दिला. मानवातील सदसद्विवेकाला आव्हान हाच या विशस्त कल्पनेचा गाभा आहे. भांडवशाही विषमतेला जन्म देते. हि विषमता जेव्हा परकोटीला पोहोचते तेव्हा त्यातेन भांडवलशाहीचा शेवट होतो. गांधीजींच्यामते जमिनदार व भांडवलदार यांनी शेतकऱ्यांचे व

...चे ट्रस्टी म्हणून काम पहावे. त्यांनी समाजाच्या भलाईचे काम करावे. तसेच गांधीजींनी म्हंटले आहे,उदयोंगाचे केंद्रीकरण म्हणजे राजकिय हिंसेचे प्रतीक होय. त्यांना मोठमोठ उदयोंग मान्य नव्हते. कारण यात श्रमिकांचे शोषण होते.म्हणून त्यांनी कुटिरोद्योगांना महत्वाचे स्थान दिले होते. व्यक्तीच्या गरजा मर्यादित असाव्यात हा अर्थशास्त्रातील सर्वमान्य सिध्दांत गांधीजींनी मांडला. त्यामुळे ज्यांच्याकडे गरजेपेक्षा अधिक संपत्ती आहे. त्यांनी आपल्या संपत्तीचे स्वत:स मालक न समजता पालक समजले पाहिजे. समाज उपयोगासाठी संपत्तीचा वापर केला पाहिले. श्रीमंतानी आपली हि नैतिक भूमिका नाकारली तर समाजाने अहिंसक मार्गाने याने हृदयपरिवर्तन केले पाहिजे.[२]

**विकेंद्रीकरण :—**

रामराज्याची स्थापना करावयाची असेल तर विकेंद्रीकरण हा मुलमंत्र असले. प्रस्थापित व्यवस्था उत्पादन संपत्ती व सत्तेच्या केंदीकरणावर भर देते.यातून समाजातील 'आहेरे व नाहिरे'या वर्गात प्रचंड दरी निर्माण होते. त्यामुळे उदयोंगधंदयाचे केंद्रीकरण म्हणजे नैतिक अध:पतनाची परमोच्च अवस्था असते. यातून आपणास बाहेर पडावयाचे असेल तर मोठया उदयोंगा ऐवजी कुटिरोद्योंगांचा विकास घडवून आणला पाहिजे असे त्यांचे मत होते. मोठ उदयोंग व यांत्रिकीकरण याला त्यांचा विरोध नव्हता तर त्यांच्या सार्वत्रिकरणाला विरोध होता. आवश्यक तेथे यांत्रिकीकरण केलेच पाहिजे असे त्यांना वाटत होते. पण येथे उपलब्ध असलेल्या अमाप मनुष्यबळाचे भान आपणास असले पाहिजे असे त्यांना वाटत होते. केंद्रीकरणातून निर्माण होणारी परस्पर तिरस्काराची भावना हिंसेला जन्म देते आणि हिच हिंसा रामराज्यांच्या मार्गातील प्रमुख अडथळा ठरते. यांत्रिकिकरण म्हणजे लाखो लोकांची बेकारी, मानवतेच्या दृष्टीने घोर अपराध होय असे गांधीजीं म्हणत.[३]

**समता :—**

समतेचे तत्व हे चिरकाल असे सत्य असल्यामुळे गांधीप्रणित रामराज्यात परस्परसंबंध हे समतेवर अधारलेले असतात. आर्थिक, राजकिय, सामाजिक समता हे राज्याच्या चिरंतन आस्तित्वासाठी अनिवार्य ठरते. या रामराज्यात जातीभेद ,अस्पृश्यता,आदी अनैतिक संकल्पनांना काडीमात्रही स्थान असणार नाही ,उच्च अथवा नीच अशा भेदाभेदांना स्थान उरणार नाही. शाश्वत अशी समता हा गांधीप्रणित रामराज्याचा आत्मा असेल.[४]

**ग्रामस्वराज्य :—**

गांधींजींच्या आदर्श राज्याचा केंद्रबिंदू ग्रामस्वराज्य आहे.भारतातील प्राचीन ग्रामासारखे आदर्श राज्याचे स्वरूप असेल. प्रत्येक खेडयाला त्यात महत्वाचे स्थान राहिल. भारताचे दर्शन हे काही शहरांत नसून असंख्य खेडयांत दिसून येते हा गांधीजींच्या रामराज्याच्या संकल्पनेचा कणा होय. राजाला आपल्या दुर्बल प्रजाजनांच्या हलाखीची जाण व सुधारणेची निकड असेल तरच ते खऱ्या अर्थाने लोकराज्य होईल असे महात्मा गांधीजींना वाटत होते.गांधीप्रणित ग्रामस्वराज्याची तीन वैशिष्टये समता, लोकसार्वभौमत्व, तत्काळ समताधिष्ठित न्याय हे असलेली दिसून येतात.[५]

**नैतिक नियमाचे पाठबळ:—**

बलवाणासाठी जेवढे,तेवढेच दुबर्लसांठी नैतिक नियमाचे पाठबळ आवश्यक असते. ग्रामराज्यातील लोकनियुक्त जनप्रतिनिधींनी काबाडकष्ट करणाऱ्या शेतकऱ्यांशी एकरूप राहिले पाहिजे व सार्वांचे जास्तीत जास्त कल्याण हेच ग्रामराज्याचे प्रमुख सुत्र होय.मूठभर शहरे आज लाखो खेडयांचे शोषणकर्ते बनली आहेत. इथल्या शहरांनीही खेडयांची अवस्था मोलकरणीसारखीच दयनीय करून ठेवली आहे असे ते म्हणतात. भारतात एकदा



Scanned with CamScanner

अशा ग्रामस्वराज्याची प्रतिष्ठापना झाली म्हणजे पृथ्वीवर पुनःश्च रामराज्य अवतरण्याला वेळ लागणार नाही,यावर गांधीजींचा ठाम विश्वास होता.[६]

**अस्पृश्यता निवारण :–**

महात्मा गांधींनी केलेल्या हिंदू धर्म व संस्कृतीच्या समर्थनामुळे त्यांच्याविषयी काही अपसमज निर्माण झाले आहेत. पण या धर्माच्या बरोबरच त्यांनी यातील दोषावर कडाडून टिका देखील केली आहे. अस्पृश्यता हादेखील असाच कलंक आहे. जो भारतीय समाजव्यवस्थेवर अत्यंत खोलवर रूजलेला आहे. त्याचे उच्चाटन गांधीजीनी आपले जीवनकार्य मानले. भारत एकाच वेळी दया,शुध्दाचरण,तपस्या या गुणानी युक्त तसाच पाप,रानटीपणा, इत्यादी दुर्गुणांनी युक्त आहे. या दुर्गुणांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी सर्वांनी मनापासून प्रयत्न केले पाहिजे असे त्यांचे मत होते. हिंदू धर्मातील अस्पृश्यता हि ब्रिटीश साम्राज्यवादयांच्या अस्पृश्यतेपेक्षाही निंदनीय आहे, असे ते म्हणत होते. महात्मा गांधी म्हणतात, स्वराज्या पेक्षाही अस्पृश्यता निवारण्याचा प्रश्न मला अधिक प्रथम क्रमांकाचा वाटतो . सन १९२०च्या यंग इंडिया मधील लेखात म्हणतात, अस्पृश्यता निर्मुलनाकडे दुर्लक्ष करून भारतीय स्वातंत्र्याची आस धरणे म्हणजे सुर्याकडे पाठ फिरवून त्याच्या दर्शनाची आस धरण्यासारखे होय. सार्वजनिक ठिकाणे अस्पृश्यासाठी खुली ठेवली पाहिजेत ,त्यांच्यात आत्मविश्वास वाढविण्यासाठी आंतरजातीय विवाहाला प्रोत्साहन दिले पाहिले. यामुळे पारंपरिक भावना नष्ट होते,असे गांधीजींना वाटत होते.[७]

**महात्मा गांधीजींचे व्यसनमुक्तीसंबंधी विचार:–**

महात्मा गांधीजींनी व्यसनाधीनते सारख्या मानसिक व्याधीकडे आपल्या पुस्तकाव्दारे लक्षवेधले होते. दारू,अफु आणि मादकपदार्थाच्या सेवनाचे दुषपरिणाम भारतीय समाजात दिसत होते. मानसिक व शारीरिक अशा दोन्ही पातळयावर मानसाला पांगू करणाऱ्या या व्यसनाचे समूळ उच्चाटन झाले पाहिजे ,ही महात्मा गांधीजींची तळमळ होती आणि व्यसनमुक्त समाज गांधीजींना अभिप्रेत होता.[८]

**मुल्यमापन:–**

महात्मा गांधीजीनी रामराज्याच्या निर्मितीसाठी सर्वोदय,ट्रस्टीशिप सिध्दांन्त,विक्रेंद्रीकरण,समता या व्यतिरिक्त व्यसनमुक्ती, अस्पृश्यता निवारण व ग्रामस्वराज्य,यांना देखील महत्वाचे स्थान दिलेले दिसून येते. सर्वोदय म्हणजे सर्वांचे सुख अगर सर्वांचे कल्याण या अर्थाने वापरला आहे. त्यात गरीब,श्रीमंत,सशक्त, अशक्त असे सर्व येतात.,'कौटुंबिक मोहाचा त्याग ,धर्म,वर्ण,जातीभेद,आदी संकोचित भावनांचा नाश करून राष्ट्रीयते ऐवजी विश्वबंधुत्वासाठी प्रयत्न करणे म्हणजे सर्वोदय होय. हेच रामराज्याच्या निर्मिती साठी आवश्यक असल्याचे विचार त्यांनी मांडले दिसून येते. ट्रस्टीशिप सिध्दांतामध्ये जमिनदार व भांडवलदार यांनी शेतकऱ्यांचे व श्रमिकांचे ट्रस्टी म्हणून काम पहावे व त्यांनी समाजाच्या भलाईचे काम करावे असे विचार मांडलेले दिसून येते. रामराज्याची स्थापना करावयाची असेल तर विकेंद्रीकरण हा मुलमंत्र असले असे त्यांनी सांगितेलेले दिसून येते. गांधीप्रणित रामराज्यात परस्परसंबंध हे समतेवर अधारलेले असतात. आर्थिक, राजकिय, सामाजिक समता हे राज्याच्या चिरंतन आस्तित्वासाठी अनिवार्य ठरते असे त्यांनी मत व्यक्त केले दिसून येते. गांधीजीच्या आदर्श राज्याचा केंद्रबिंदू ग्रामस्वराज्य आहे.भारतातील प्राचीन ग्रामासारखे आदर्श राज्याचे स्वरूप असले पाहिजे असे त्यांनी विचार मांडलेले दिसून येते. हिंदू धर्मातील अस्पृश्यता हि ब्रिटीश साम्राज्यवादयांच्या अस्पृश्यतेपेक्षाही निंदनीय आहे,स्वराज्या पेक्षाही अस्पृश्यता निवारण्याचा प्रश्न मला अधिक प्रथम क्रमांकाचा वाटतो असे मत



Scanned with CamScanner

त्यांनी व्यक्त केले. तसेच व्यसनाधीनते सारख्या मानसिक व्याधीकडे आपल्या पुस्तकाव्दारे महात्मा गांधीजींनी लक्षवेधले होते.

**संदर्भ ग्रंथ सूची**

१. वैद्य सुमन, कोठेकर शांता,आधुनिक भारताचा इतिहास,साईनाथ प्रकाशन,नागपूर,नववी
२. आवृत्ती ऑगस्ट २०१३, पृ २९५
३. ग्रोवर बी,एल, बेल्हेकर एन,के , आधुनिक भारताचा इतिहास, एस,चंन्द आणि कंपनी
४. लिमिटेड, दिल्ली, २०१८, पृ ४८२
५. यादव आनंद,आधुनिक भारताचा इतिहास,यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ नाशिक,
६. जुलै २००२, पृ २९५
७.Cousins Norman]Profiles of Gandhi]Gandhi Research Foundation]Jalgaon]Reprinted in April 2014 , P-80
८. राऊत गणेश,शिंदे पी,एन,थोरात ए,जी, आधुनिक भारताचा इतिहास,डायमंड
९. पब्लिकेशन्स,पुणे,जुलै२०१४,पृ ११६
१०.पाटील आनंद, सामान्य क्षमता चाचणी संपुर्ण मार्गदर्शक,स्टडी सर्कल प्रकाशन, दादार
११.(प),मुंबई २००२, पृ ५२
१२. Cousins Norman]Profiles of Gandhi]Gandhi Research Foundation]Jalgaon]Reprinted in April 2014 , P-119
१३.वैद्य सुमन, कोठेकर शांता,आधुनिक भारताचा इतिहास,साईनाथ प्रकाशन,नागपूर,नववी
१४.आवृत्ती ऑगस्ट २०१३, पृ २८६



Scanned with CamScanner